# प्रकरण पाचवे
# सारांश आणि निष्कर्ष
## (Summary and Conclusions)

**प्रस्तावना :**

"ग्रामिण दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमाचा प्रभाव : करवीर तालुक्यातील स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचा अभ्यास" हा प्रस्तुत लघुशोधप्रबंधाचा विषय आहे. प्रस्तुत लघुशोधनिबंधाची विभागणी एकूण पाच प्रकरणात केली आहे. प्रस्तुत पाचव्या प्रकरणात आधीच्या चार प्रकरणांचा सारांश आणि प्रमुख निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

**प्रकरण पहिले : स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे स्वरूप :**

भारत सरकार गरिबी दूर करण्यासाठी प्रथमपासूनच महत्त्व देत आले आहे. म्हणून गरिबीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी सरकार विविध योजना राबवत आलेले आहे. केंद्र शासनाने पूर्वीच्या एकात्मिक ग्रामिण विकास योजनेची पुनर्रचना करून २१ व्या शतकाची नांदी म्हणून १ एप्रिल १९९९ पासून 'स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना' ही महत्त्वाकांक्षी योजना सुरू केली. स्वयंसहाय्यता बचत गट हा या योजनेचा आत्मा आहे. प्रस्तुत प्रकरणात स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये स्पष्ट केली आहेत. तसेच स्वयंसहाय्यता गटाची गरज व मार्गदर्शक तत्त्वे स्पष्ट केली आहेत. बचत गटांची नियमावली, कर्जविषयक सूत्रे, बचतीची पद्धत, हिशोब पद्धती, प्रतवारी तपासण्या इत्यादीचे सविस्तर विवेचन या प्रकरणात केलेले आहे.

## प्रकरण दुसरे : संशोधन साहित्याचे परिशिलन आणि पद्धतीशास्त्र :

दुसऱ्या प्रकरणामध्ये दोन विभाग केले आहेत. पहिल्या विभागामध्ये उपलब्ध अभ्यासांच्या परिशिलनावरून आधीच्या अभ्यासातील निष्कर्षांचा थोडक्यात आढावा घेतला आहे. प्रकरणाच्या दुसऱ्या विभागात प्रस्तुत अभ्यासासाठी अवलंबिण्यात आलेल्या संशोधन पद्धतीविषयीचे विवेचन आहे.

## १) अभ्यासाची उद्दिष्ट्ये :

प्रस्तुत अभ्यासाची विशिष्ट उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे ठरविण्यात आली होती.

१. स्वर्णजयंती ग्र म स्वरोजगार योजनेच्या महत्वाच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.

२. करवीर तालुक्यातील निवडलेल्या खेडेगावामधील SGSY अंमलबजावणीचा अभ्यास करणे.

३. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजार योजनेच्या लाभार्थींवर झालेल्या प्रभावाचा अभ्यास करणे.

प्रस्तुत अभ्यासासाठी सलग चार वर्षे चालू असलेले SGSY योजनेअंतर्गत लाभ झालेले बचत गट निवडण्याचे निश्चित केले. त्यानुसार या अभ्यासासाठी करवीर तालुक्यातील वसगडे, निगवे दुमाला आणि आंबेवाडी या तीन गावांची हेतुनिष्ट नमुना निवड पद्धतीने निवड केली आहे. या तीन गावामधील ५ बचत गटांची निवड करून त्यांचे सभासद असणाऱ्या एकूण ५० लाभार्थींचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात केला आहे.

## २) तथ्य संकलनासाठी वापरलेली तंत्रे / साधने :

तथ्य संकलनासाठी मुलाखत अनुसूचीचा (Interview Schedule) अवलंब करण्यात आला. अभ्यासाची उद्दिष्ट्ये नजरेसमोर ठेऊन एक मुलाखत अनुसूची तयार केली. सदर अनुसूचीची एक पूर्वचाचणी (Pre-testing) घेण्यात आली व नंतर योग्य त्या दुरूस्त्या करून अनुसूचीस अंतिम रूप दिले.

## ३) तथ्य संकलन :

संशोधनासाठी निवडलेल्या नमुन्यातील ५ बचतगटातील ५० लाभार्थ्यांच्याकडून संशोधिकेने मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने माहिती संकलित केली. तथ्य संकलनाचे काम १० मार्च ते २० मार्च २००७ व १ एप्रील ते २५ मे पर्यंत पूर्ण केले.

## ४) माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरण :

मुलाखत अनुसूचिद्वारे संकलित केलेल्या माहितीचे सुयोग्य वर्गीकरण आणि विश्लेषण करण्यासाठी संगणकाचा वापर करून त्या माहितीवर प्रक्रिया करण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार एक संकेत पुस्तिका तयार करण्यात आली. संकेत पुस्तिकेच्या सहाय्याने मिळविलेल्या माहितीचे सांकेतीकरण केले. सदरची माहिती समाजशास्त्र विभागात UGC-SAP-DRS-Phase I या प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध झालेल्या संगणक प्रयोगशाळेतील संगणकात भरण्यात आली. SPSS सॉफ्टवेअरच्या सहाय्याने माहितीवर प्रक्रिया करण्यात आली.

संगणकाच्या सहाय्याने प्रक्रिया केलेल्या माहितीच्या आधारे सारण्या तयार करण्यात आल्या आहेत. त्यातील सांख्यिकी माहितीचे विश्लेषण करून अभ्यासाचे निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

**प्रकरण तिसरे : कोल्हापूर जिल्ह्यातील स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेची अंमलबजावणी आणि प्रगती : थोडक्यात आढावा**

या प्रकरणात दोन विभाग पाडण्यात आले आहेत. पहिल्या भागात कोल्हापूर जिल्ह्यातील स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेची अंमलबजावणी व प्रगतीचा आढावा घेतलेला आहे. दुसऱ्या विभागात निवडलेल्या गावातील SGSY योजनेच्या अंमलबजावणीविषयीचे विवेचन करण्यात आले आहे.

कोल्हापूर जिल्हा हा बारा तालुक्यांनी बनलेला असून २००१ च्या जणगणनेनुसार जिल्ह्याची लोकसंख्या ३५.२३ लाख आहे. त्यापैकी २४.७३ (७०%) ग्रामीण तर १०.५० (३०%) नागरी लोकसंख्या आहे. जिल्ह्यातील १२ तालुक्यापैकी करवीर तालुका हा सर्वात जास्त नागरी लोकसंख्या असलेला तालुका आहे. संशोधिकेने अभ्यासासाठी करवीर तालुक्यातील वसगडे, आंबेवाडी व निगवे दुमाला ही गावे निवडली होती. करवीर तालुक्यात एकूण ७९,७५४ कुटुंबापैकी १४,०२८ (१७.५८%) इतकी कुटुंबे दारिद्र्य रेषेखालील आहेत.

कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत दहाव्या (२००२-२००७) पंचवार्षिक योजनेसाठी एकूण ९८.६९६ इतक्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची संख्या निश्चित करून दिलेली आहे. याची एकंदर टक्केवारी १७.५८ इतकी आहे.

प्रस्तुत विभागात प्रामुख्याने कोल्हापूर जिल्ह्यातील स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेतील सन २००४-०६ या काळातील स्वयंसहाय्यता बचतगट प्रगती अहवाल, स्वयंसहाय्यता बचतगट व स्वरोजगारी (लाभार्थी) व स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजनेतील प्रशिक्षण वर्गाची वर्षनिहाय माहिती, तसेच कोल्हापूर जिल्हा (२००३-०७ पर्यंत) आर्थिक तरतूद दाखविणारा तक्ता, बाबवार खर्चाचा तपशील (माहे मार्च २००७), स्वरोजगारी उद्दिष्ट, बचतगटाबाबत माहिती, बचतगट स्थापन व बँक जोडणी माहिती इ. ठळक बाबीचे विवेचन सादर केले आहे.

**स्वयंसहाय्यता बचत गट प्रगती अहवाल : ठळक बाबी**

१) सन २००३-२००६ पर्यंत एकूण २२८५ बचत गट स्थापन झालेले होते. त्यापैकी एकूण १६९३ महिला बचत गट आहेत यावरून असे दिसते की, गेल्या तीन वर्षात स्थापन झालेल्या एकूण SHG पैकी ७५% महिला बचत गट आहेत. यावरून असे म्हणता येईल की या योजनेबाबत महिलामधील जागृतता व बचतगटातील सहभाग व लाभार्थी यांच्यात वाढ होत आहे व त्याचा फायदा दारिद्र्य रेषेखालील महिला कुटुंबाना मिळत आहे.

२) आर्थिक मदत झालेल्या महिला लाभार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. लाभार्थींची ही संख्या सन २००३-०४ मध्ये १०१३ सन २००४-०५ मध्ये १४६२ तर सन २००५-०६ मध्ये २०४६ इतकी आहे.

३) प्रशिक्षण दिलेल्या लाभार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. ही संख्या सन २००३-०४ मध्ये १०१३, सन २००४-०५ मध्ये २०७० तर २००५-०६ मध्ये

२०४६ इतकी वाढली आहे. कोल्हापूर जिल्हा - आर्थिक प्रगती अहवाल २००४-०५ ठळक बाबी पुढीलप्रमाणे :

४) सदर योजनेसाठी सन २००३-०४ मध्ये एकूण १८८.६६ इतका निधी प्राप्त झाला. त्यापैकी १८८.३७ लाख खर्च झाला. २००४-०५ मध्ये २२८.५८ लाख इतका निधी प्राप्त झाला तर २२८.५० लाख इतका खर्च झाला. २००५-०६ मध्ये २३६.४७ लाख इतका निधी प्राप्त झाला तर २२६.५९ लाख इतका खर्च झाला. यामध्ये प्रामुख्याने केंद्रशासनाकडून व राज्यशास्त्राकडून मिळालेला हिस्सा यांचे प्रमाण ७५:२५ या गुणोत्तरात दिसते.

५) स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत कर्ज रक्कम (अनुदानासह) ४७६.१५) इतके उद्दिष्ट्य होते तर ५६५.०४ इतके साध्य झालेले आहे. याचा अर्थ ठरविलेल्या रक्कमेपेक्षा जास्त रक्कम खर्च झाली आहे. प्रतिस्व रोजगारी गुंतवणूक २५००० इतके उद्दिष्ट्य आहे पण २१८१२ इतके साध्य झाले आहे. या सर्व खर्चामध्ये स्वरोजगारी अनुदान ६०% खेळते भांडवल १०%, प्रशिक्षण १०%, मुलभूत सुविधा २०%, अनुसूचीत जाती-जमाती ५०%, महिला ४०%, अपंग ३% इतके खर्च करण्यात आले आहे.

६) SGSY योजनेअंतर्गत एकूण १५०० स्वरोजगारी उद्दिष्ट होते. त्यापैकी १४३७ बचत गटांचे सभासद त्यामध्ये ९५ वैयक्तीक असे एकूण १५३२ स्वरोजगारींचे उद्दिष्ट साध्य झालेले आहे.

७) SGSY योजनेअंतर्गत १/४/९९ ते ३१ मार्च २००६ पर्यंत ३८३२ दा. रे. खालील व १५१६८ बिगर दा. रे. खालील असे एकूण १९००० बचत गट स्थापन झाले आहेत. १ एप्रिल २००६ ते ३१ मार्च २००७ पर्यंत एकूण ७२०४ बचत गट स्थापन झालेले आहेत. त्यापैकी ११८५ घरे खालील तर ६०१९ बीगर दा. रे. खाली दिसून येतात.

८) ६०८ दा.रे. खालील व ६१७० बिगर दा. रे. खालील अशा एकूण १०५८९ बचत गटांची बँक जोडणी झाली आहे व १ एप्रिल २००६ ते ३१-३-२००७ पर्यंत ६०८ दा. रे. खालील व ६१७० असे एकूण ६७७८ बचत गटांची बँक जोडणी झाली आहे.

## प्रकरण चौथे : स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचा प्रभाव

प्रस्तुत प्रकरणात तीन भाग पाडण्यात आले आहेत. पहिल्या भागात उत्तरदात्यांच्या सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमीचे वर्णन केले आहे. दुसऱ्या भागात स्वयंसहाय्यता गटाच्या कार्यपद्धती विषयीच्या उत्तरदात्यांच्या प्रतिक्रियांचे विश्लेषण केले आहे तर तिसऱ्या भागात स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचा लाभार्थ्यांवर कसा प्रभाव पडला आहे याचे विवेचन करण्यात आले आहे.

### अ) उत्तरदात्यांची सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमी :

१) बहुसंख्य उत्तरदाते (३८%) ३१ ते ४० वयोगटातील आहेत.

२) नमुन्यातील तिन्ही गावामध्ये विवाहित महिला उत्तरदात्यांचे प्रमाण जास्त (७६%) आहे. विधवा (११%) व परितक्त्या महिलांना (२%) देखील SGSY अंतर्गत लाभ मिळत आहे ही उल्लेखनीय बाब आहे.

३) उत्तरदात्यांचे जातीनुसार वर्गीकरण केले असता असे दिसून आले की, निवडलेल्या नमुन्यातील सर्वाधिक उत्तरदाते (४२%) महार आहेत, त्यानंतर मराठा जातीचे उत्तरदाते (२०%) तर मुस्लीम व सुतार प्रत्येकी ५ (१० टक्के) उत्तरदाते आहेत. कुंभार जातीचे उत्तरदाते ३ (६ टक्के) आणि चांभार व खाटीक जातीचे प्रत्येकी उत्तरदाते २ (४%) आहेत तर प्रत्येकी एक उत्तरदाता मांग व जैन आहे.

४) यावरून असे म्हणता येईल की, सामाजिक तसेच आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणाऱ्या अनुसूचित जाती आणि इतर मागासवर्गीय जातीच्या बहुसंख्य सदस्यांबरोबरच धार्मिक अल्पसंख्यांकामधील गरीबांना (उदा. मुस्लिम व जैन) तसेच खुल्या प्रवर्गातील गरीब व गरजूंना SGSY मुळे स्वत:ची आर्थिक उन्नती करून घेण्याची संधी मिळाली आहे.

५) नमुन्यातील ५० उत्तरदात्यापैकी बहुसंख्य (८८%) हिंदू धर्मीय आहेत. तसेच मुस्लीम ५% व जैन २ टक्के आहेत.

६) नमुन्यातील ५० उत्तरदात्यांपैकी बहुसंख्य (४८%) ७ वी पर्यंत शिकलेले आहेत.

७) निरक्षर उत्तरदात्यांचे प्रमाण (४२%) लक्षणीय आहे.

८) नमुन्यातील ५० उत्तरदात्यांपैकी ७०% उत्तरदात्यांचा स्वत:चा प्रमुख व्यवसाय शेतमजूरी आहे.

९) नमुन्यातील ५० उत्तरदात्यांपैकी बहुसंख्य लाभार्थ्यांच्या तीन पिढ्या प्रामुख्याने शेतमजूरीवर आपला चरितार्थ चालवित आले आहेत. आर्थिकदृष्ट्या अत्यंत कमकुवत गटातील हे लाभार्थी आहेत असे म्हणता येईल.

१०) नमुन्यातील ५० उत्तरदात्यांपैकी ९०% उत्तरदात्यांचा दुग्धव्यवसाय हा दुय्यम व्यवसाय आहे.

११) नमुन्यातील ५० उत्तरदात्यांपैकी बहुतांशी म्हणजे ६८% उत्तरदात्यांचे वार्षिक उत्पन्न रु. २०,००१ ते ४०,००० या प्रवर्गात मोडणारे आहे.

१२) निवडलेल्या नमुन्यातील ५० उत्तरदात्यापैकी सर्वच उत्तरदात्यांचे रहाते घर स्वत:च्या मालकीचे आहे. शासनाने राजीव गांधी ग्रामीण निवारा योजनेअंतर्गत बेघर लोकांना कच्ची घरे बांधून दिली आहेत. बहुसंख्य उत्तरदाते या योजनेचे लाभार्थी आहेत.

१३) नमुन्यातील ५० उत्तरदात्यांपैकी बहुसंख्य (७६%) उत्तरदात्यांच्या घरी वीज कनेक्शन आहे तर बाथरूम सुविधा ५६% उत्तरदात्यांच्या घरी आहेत. मात्र बहुसंख्य उत्तरदात्यांच्याकडे (३८%) नळाचे कनेक्शन नाही.

१४) नमुन्यातील ५० उत्तरदात्यापैकी केवळ ३ उत्तरदाते वगळता अन्य सर्वांच्याकडे दुभती जनावरे (म्हैस) आहेत.

## ब) स्वयंसहाय्यता गटाची कार्यपद्धती : उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया :

स्वयंसहाय्यता गट हे परस्पर सहकार्याच्या तत्वावर आधारित असतात यात समता, बंधुता व परस्परसहाय्य, सेवा इ. तत्वांचा अंतर्भाव आहे. 'ALL FOR EACH AND

EACH FOR ALL' हे गटांचे ब्रीद वाक्य आहे. बचत गटांमुळे नियमित बचतीची सवय लागते. काटकसरीचे महत्त्व लक्षात येते व तारण नसतानाही कर्ज मिळते. स्वयंसहाय्यता गट म्हणजे गरीब गरजू लोकांचे ATM आहे.

उत्तरदात्यांच्या प्रतिक्रियांवरून निदर्शनास आलेल्या ठळक बाबी खालीलप्रमाणे :

१) निवडलेल्या नमुन्यातील ५ बचत गटापैकी दोन गट स्थापून ५ वर्षे झाली आहेत तर दुसरे दोन गट स्थापन होऊन ४ वर्षे झालेली आहेत एकच गट स्थापन होऊन ७ वर्षे झालेली आहेत.

२) निवडलेल्या नमुन्यातील ५ बचतगटातील सर्वच उत्तरदाते गटांच्या सभांना नेहमी उपस्थित असतात, असे त्यांनी सांगितले. १००% उपस्थितीचे कारण लक्षात घेतले असता असे स्पष्ट झाले की, सभा रात्रीच्या वेळी जेवण झाल्यावर घेत असल्याने स्त्रियांना सभांना हजर राहणे सोयीचे होते.

३) महिन्यातून एकदा होणाऱ्या बचत गटांच्या सभेमध्ये दोन ते तीन जणांचा क्रियाशील सहभाग असतो अशी माहिती मिळाली. यामध्ये अध्यक्ष व सचिव यांचा महत्त्वाचा विशेष सहभाग असतो. तसेच आणखीन एखादी व्यक्ती स्वेच्छेने व अन्य सदस्य गरजेच्या वेळी सभेत क्रियाशील भाग घेतात.

४) निवडलेल्या ५ बचतगटातील ५० उत्तरदात्यांपैकी बहुसंख्य (६०%) दरमहा ५० रु. बचत करतात. उर्वरित (४०%) उत्तरदाते दरमहा ३० रु. बचत करतात.

५) निवडलेल्या ५ बचत गटातील ५० उत्तरदात्यापैकी बहुसंख्य संभासदांना त्यांची गरज पाहून, तसेच कर्ज फेडण्याची क्षमता व त्यांची बचत गटातील बचत पाहून

बचतीच्या तीनपट किंवा अर्जदार व जमिनदार यांच्या बचतीएवढी रक्कम कर्ज म्हणून दिली जाते. यावरून असे म्हणता येईल की, बचत गटांद्वारे कार्यपद्धतीच्या नियमानुसार कर्जवाटप केले जात आहे.

६) निवडलेल्या पाच बचतगटातील ५० उत्तरदात्यांपैकी बहुसंख्य उत्तरदात्यांनी असे सांगितले की, कर्जदाराकडून कर्जाच्या परतफेडीसाठी वचनचिठ्ठी लिहून घेतली जाते. दोन जामिनदार घेतले जातात. कर्जाच्या प्रमाणात समान मासिक हप्ता ठरविला जातो. जर हप्ता १ ते ८ तारखेपर्यंत वेळेवर दिला नाही तर दंड घेतला जातो.

७) निवडलेल्या नमुन्यातील ५ बचतगटातील ५० उत्तरदात्यांपैकी ४४ सभासदांनी दुग्ध व्यवसायासाटी खेळते भांडवल घेतले आहे. तर उर्वरित ६ पैकी ३ उत्तरदात्यांनी कुंभारकामासाठी व खाटीक काम, कोचिंग काम, हळदीकुंकू व्यापारासाठी प्रत्येकी एक उत्तरदात्याने खेळते भांडवल घेतलेले आहे.

८) निवडलेल्या नमुन्यातील ५ बचतगटातील ५० उत्तरदात्यांपैकी सर्वांनीच बचतगटाची कार्यपद्धती व नियमावली माहित असल्याचे सांगितले.

९) निवडलेल्या नमुन्यातील ५ बचतगटातील ५० उत्तरदात्यापैकी ६८% उत्तरदाते बचत गटात सहभागी होण्यापूर्वी सावकाराकडून कर्ज घेत असल्याचे समजले. अन्य उत्तरदाते (३०%) 'भिशी' मधून कर्ज घेत होते असे समजले.

१०) बचत गटात सहभागी झाल्यामुळे सर्वच्या सर्व सभासदांना कर्ज मिळणे सोपे झालेले आहे.

११) निवडलेल्या नमुन्यातील ५० उत्तरदात्यांचे मतानुसार बचत गटामुळे लोकांचे सावकारांकडे जाण्याचे प्रमाण कमी झाले आहे.

१२) निवडलेल्या नमुन्यातील ५० उत्तदरदात्यांपैकी बहुसंख्य (५२%) उत्तरदाते बचत गटाबाबत 'काही प्रमाणात समाधानी', ३६% उत्तरदाते 'मध्यमप्रमाणात समाधानी', ९% उत्तरदाते 'बहुतांशी प्रमाणात समाधानी' आहेत तर, 'अत्यल्प प्रमाणात समाधानी' एकच उत्तरदाता आहे, असे त्यांच्या प्रतिक्रियांवरून दिसून आले. यावरून नमुन्यातील सर्वच उत्तरदाते समाधानी आहेत परंतू त्यांच्या समाधानाच्या प्रमाणाबाबत मात्र फरक दिसून आला आहे.

## क) स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचा प्रभाव :

१) स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचा प्रभाव दर्शविणारे ठळक मुद्दे खालीलप्रमाणे :

निवडलेल्या नमुन्यातील ५ बचतगटातील ५० उत्तरदात्यांपैकी स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत (८८%) उत्तरदात्यांनी दुग्ध व्यवसायासाठी कर्ज घेतलेले दिसते. पारंपारिक व किरकोळ अन्य व्यवसायासाठी (१२%) उत्तरदात्यांनी कर्ज घेतलेले आहे. यावरून असे म्हणता येते की, दुग्धव्यवसाय हा कोल्हापूर जिल्ह्यात महत्त्वपूर्ण व किफायतशीर जोड व्यवसाय आहे असे म्हणता येईल. याचे कारण दर आठवड्याला पैसा उपलब्ध होतो व व्यवसायासाठीची कौशल्ये अनौपचारिक रितीने लोकांना सहजगत्या अवगत करून घेता येतात. उर्वरित उत्तरदात्यांनी त्यांच्या परंपरागत व अन्य किरकोळ व्यवसायासाठी की ज्याबाबतचे ज्ञान त्यांना आधीच आहे त्यासाठी कर्ज घेतलेले आहे.

२) निवडलेल्या ५ बचतगटातील ५० उत्तरदात्यांपैकी बहुसंख्य (७४%) उत्तरदात्यांचे प्रकल्पापूर्वीचे उदरनिर्वाहाचे मुख्य साधन शेतमजूरी हेच होते. पारंपारिक व किरकोळ अन्य व्यवसायावर २६% उत्तरदाते आपला उदरनिर्वाह चालवीत होते.

३) निवडलेल्या पाच बचतगटातील ५० उत्तरदात्यापैकी बहुसंख्य (४६%) उत्तरदात्यांचे प्रकल्पापूर्वीचे वार्षिक उत्पन्न १०,००० ते २०,००० पर्यंत आहे. तर १०,००० उत्पन्न असणारे (२८%) उत्तरदाते आहेत तर २०,००१ ते ३०,००० पर्यंत उत्पन्न असणारे २६% उत्तरदाते आहेत.

४) निवडलेल्या पाच बचतगटातील ५० उत्तरदात्यापैकी बहुसंख्य (८८%) उत्तरदात्यांनी प्रत्येकी एकूण भांडवल गुंतवणूक १५,५०० रूपये केलेली आहे. पारंपारिक व अन्य किरकोळ व्यवसायासाठी उत्तरदात्यांनी (१२%) रूपये १२,५०० इतकी भांडवल गुंतवणूक केलेली आहे. निवडलेल्या नमुन्यातील ५ बचत गटातील ५० उत्तरदात्यांचे प्रकल्प २००४ साली सुरू झालेले आहेत.

५) निवडलेल्या नमुन्यातील ५ बचतगटातील ५० उत्तरदात्यांपैकी ९०% उत्तरदात्यांना प्रशिक्षण मिळालेले आहे. नमुन्यातील १०% उत्तरदात्यांना प्रशिक्षण मिळालेले नाही. नुमन्यातील उत्तरदात्यांना पंचायत समितीमार्फत प्रशिक्षण मिळाले आहे. नमुन्यातील २४ उत्तरदात्यांना २ दिवसाचे, २० उत्तरदात्यांना, ५ दिवसाचे तर एका उत्तरदात्याला ३ दिवसांचे प्रशिक्षण मिळालेले आहे.

६) निवडलेल्या नमुन्यातील ५ बचत गटांमधील ५० उत्तरदात्यांपैकी ९८% उत्तरदात्यांचे प्रकल्पान्तरचे वार्षिक उत्पन्न वाढलेले आहे. एकाच उत्तरदात्याचे उत्पन्नात

फारशी वाढ झालेली नाही. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत ५० स्वरोजगारीनी सुरू केलेल्या प्रकल्पामुळे त्याच्या उत्पन्नात वाढ झाली आहे काय यासाठी तीन वर्षातील (२००४-०५, २००५-०६ आणि २००६-०७) उत्पन्नाची आकडेवारी च्या अभ्यासावरून असे दिसून आले की, २००४ मध्ये बहुसंख्य उत्तरदात्यांचे (६४%) उत्पन्न रु. १०,००० पर्यंत होते. पण २००५-०६ आणि २००६-०७ या दोन वर्षात या कमी उत्पन्न गटातील उत्तरदात्यांची संख्या कमी होऊन १०,००१ ते २०,००० आणि २०,००१ ते ३०,००० या उत्पन्न गटातील उत्तरदात्यांची संख्या वाढलेली आहे. यावरून कमी उत्पन्न गटातील उत्तरदाते जास्त उत्पन्न गटात केलेले आहेत. म्हणजेच स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेच्या लाभ उत्तरदात्यांना झाला आहे.

२००४ ते २००७ मधील प्रकल्पापासून मिळणाऱ्या उत्पन्नाबाबतच्या आकडेवारीच्या विश्लेषणावरून खालील बाबी दिसून आल्या.

अ) निवडलेल्या नमुन्यातील ५० उत्तरदात्यांच्या एकूण उत्पन्नात २००४-०५ चा तुलनेत २००५-०६ व २००६-०७ मध्ये वाढ झाली आहे.

ब) निवडलेल्या ५० उत्तरदात्यांचे २००४-०५ मधील सरासरी उत्पन्न १०२१२ होते, ते २००५-०६ मध्ये ३२३६ इतके झाले. (३१.७% वाढ); तर २००६-०७ मध्ये १६२६२ इतके झाले; म्हणजे २००४-०५ च्या आधारभूत उत्पन्नात ५९.२% इतकी वाढ झाली.

क) निवडलेल्या ५० उत्तरदात्यांच्या कुटूंबाच्या उत्पन्नात सरासरी तीन हजार रूपयाहून अधिकची वाढ झाली आहे.

ड) SGSY अंतर्गत प्रकल्प सुरू होण्यापूर्वीचे सरासरी वार्षिक उत्पन्न १५२१९ आणि प्रकल्प सुरू झाल्यानंतरचे सरासरी वार्षिक उत्पन्न रु. ३२२६७ यांची तुलना केल्यावर असे दिसून आले की, SGSY अंतर्गत प्रकल्प सुरू केल्यानंतर स्वरोजगारींच्या उत्पन्नात सरासरी १७०४८ (३२२६७-१५२१९ = १७०४८) इतकी वाढ झाली.

७) निवडलेल्या नमुन्यातील ५० लाभार्थी कुटुंबातील सरासरी १.७ व्यक्तींना स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेमुळे रोजगार उपलब्ध झाला आहे.

८) निवडलेल्या नमुन्यातील ५ बचतगटातील ५० उत्तरदात्यापैकी ८०% उत्तरदात्यांचे पहिल्या प्रकल्पासाठीचे कर्ज फिटलेले आहे. तर २०% उत्तरदात्यांचे कर्ज अशंत: फिटलेले आहे. ८०% उत्तरदात्यांचे कर्ज फिटले आहे. याचा अर्थ त्यांचे उत्पन्न वाढत आहे. दुसऱ्या प्रकल्पासाठी नमुन्यातील (८०%) उत्तरदात्यांनी कर्ज घेतलेले आहे. तर नमुन्यातील (२०%) उत्तरदात्यांनी दुसऱ्या प्रकल्पासाठी कर्ज घेतलेले नाही. पहिल्या कर्जामुळे त्यांच्या आर्थिक क्षमतेत वाढ झाल्यानेच दुसऱ्या प्रकल्पासाठी कर्ज घेतलेले आहे असे म्हणता येईल.

९) नमुन्यातील बहुसंख्य (६०%) उत्तरदाते प्रकल्पाबाबत आणि मिळणाऱ्या उत्पन्नाबात 'मध्यम प्रमाणात समाधानी' आहेत तसेच १५% उत्तरदाते 'काही प्रमाणात समाधानी' आहेत.

१०) नमुन्यातील ५० उत्तरदात्यापैकी सर्वांनीच त्यांच्या प्राथमिक गरजा भागतात असे सांगितले.

११) नमुन्यातील बहुसंख्य उत्तरदात्यांनी (८०%) वाढलेल्या उत्पन्नामुळे आता मुलांना शिक्षण देणे शक्य झाले आहे असे सांगितले.

१२) बचतगटांमुळे खालील बाबी शक्य झाल्या आहेत.

अ) बचतगट सदस्यांना दवाखाना, लग्नकार्य इ.साठी कर्ज गटाकडून ताबडतोब मिळते.

ब) गटातील सदस्यांत सामाजिक संबंध निर्माण झाल्याने एकमेकांच्या गरजा एकमेकांच्या सहाय्याने भागतात.

क) बचत गटातील महिलांमध्ये बचतीची सवय लागली आहे. महिलांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण झाल्याने महिला मंडळे निर्माण होऊन दारूबंदीसारखे कार्यक्रम महिला राबवीत आहेत.

नमुन्यातील सर्वच उत्तरदात्यांनी स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना अशीच चालू रहावी, कर्जाची रक्कम वाढवून मिळावी, कर्ज मिळत असताना दिरंगाई होऊ नये अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

प्रस्तुत लघुप्रबंधात अभ्यासलेल्या करवीर तालुक्यातील वसगडे, निगवे दुमाला व आंबेवाडी या गावातील दारिद्र्य रेषेखालील लोकांना स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचा फायदा झाला आहे. या तीन गावातील उत्तरदात्यांकडून मिळालेल्या माहितीवरून २००४ ते २००७ या तीन वर्षात स्वरोजगारीची आर्थिक प्रगती झाल्याचे दिसून आले. SGSY या योजनेमध्ये महिला बचत गटांचा वाढता सहभाग दिसून आला. महिलांच्या मध्ये सामाजिक जाणीव तसेच बचत करण्याची सवय दिसून आली. त्यामुळे महिलांचा उत्कर्ष होत आहे. तसेच सर्व लाभार्थी हे आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गातील दिसून आले. निवडलेल्या ५०

लाभार्थींमध्ये बहुसंख्य व्यक्तींनी दुग्धव्यवसाय करून आपला उत्कर्ष करण्याकडे त्यांचा कल दिसून आला. दुधाला बाजारपेठ उपलब्ध आहे पण अन्य व्यवसायांकरिता बाजारपेठेची उपलब्धता असणे आवश्यक आहे. पहिले कर्ज फेडल्यावर दुसऱ्या कर्जाला विलंब होऊ नये यासाठी शासनाने बँक व लाभार्थ्यांमध्ये समन्वय साधून आणला पाहिजे. तसेच या योजनेत महिलांचा आणखीन सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.